मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अभय योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## 20 दिवसांत 27 हजार 840 मिळकत कर थकबाकीदारांनी घेतला अभय योजनेचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अभय योजना लागू केल्यापासून २० दिवसांमध्ये तब्बल २७ हजार ८४० मालमत्ता कर थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेचा लाभ घेत भरलेल्या मालमत्ता कराची रक्कम तब्बल ८० कोटींहून अधिक आहे. ही योजना ३१ मार्च २०२६ (रात्री १२ पर्यंत) सुरू राहणार असून, अद्याप ज्या मालमत्ताधारकांचा मालमत्ता कर भरणे बाकी आहे, अशा थकबाकीदारांनी दिलेल्या मुदतीत मालमत्ता कराची थकबाकी एकरकमी भरून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.




अभय योजना लागू झाल्यापासून १ मार्च २०२६ (सकाळी १० पासून) ते २० मार्च २०२६ (दुपारी १२ पर्यंत) या २० दिवसांच्या काळात तब्बल २७ हजार ८४० मालमत्ताधारकांनी या योजनेचा लाभ घेत ८० कोटींहून अधिक रक्कम जमा झाली आहे. या योजनेअंतर्गत थकबाकीदारांना १९ कोटी १५ लाखांची सवलत देण्यात आली आहे. आतापर्यंत ५ लाखांहून अधिक मालमत्ताधारकांनी ८३० कोटी ५ लाखांचा भरणा केला आहे.

महानगरपालिकेच्या मालमत्ता कर वसुली मोहिमेस नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, मोठ्या प्रमाणावर कर संकलन झाले आहे. तसेच काही मालमत्ताधारकांकडून अद्याप थकीत रकमेचा भरणा झालेला नसून, अशा मालमत्ताधारकांनी महानगरपालिकेच्या 'अभय योजना'चा लाभ घेऊन ३१ मार्च २०२६ पूर्वी थकीत मालमत्ता कर भरून विलंब शुल्कावर ९० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

> **महानगरपालिकेच्या 'अभय योजने'ला नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. ही योजना नागरिकांना दिलासा देणारी असून, विलंब शुल्कावर ९० टक्के सवलतीमुळे थकबाकीदारांना मोठा आर्थिक फायदा होत आहे. मात्र अजूनही काही मालमत्ताधारकांकडून थकीत कराचा भरणा झालेला नाही. अशा सर्वांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी थकीत रक्कम एकरकमी भरून या योजनेचा लाभ घ्यावा. महापालिकेकडून ऑनलाइन सुविधा तसेच सर्व कर संकलन केंद्रे सुरू ठेवण्यात आली असून, सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही ही केंद्रे खुली राहणार आहेत. नागरिकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता तातडीने कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा.**
>
> **- डॉ. विजय सुर्यवंशी , आयुक्त , पिंपरी चिंचवड**

> **महानगरपालिकेच्या 'अभय योजना'ला नागरिकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद हा प्रशासनावर असलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. ही योजना नागरिकांना दिलासा देणारी असून, थकीत मालमत्ता करावरील विलंब शुल्कात मोठी सवलत देऊन आर्थिक दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्या नागरिकांकडे अद्याप थकीत मालमत्ता कर बाकी आहे, त्यांनी ३१ मार्चपूर्वी या योजनेचा लाभ घेऊन आपली आर्थिक बचत करावी.**
>
> **- रवि लांडगे, महपौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

---

# राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क रस्त्याच्या कामाला गती!

## महापौरांनी घेतला आढावा : वेळेत व गुणवत्तापूर्ण काम पूर्ण करण्याचे दिले निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी परिसरातील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या मार्गावरील रस्त्याचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित आहे. त्यामुळे हे काम गुणवत्तापूर्ण, वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या कालावधीत वाहतुकीस कमीत कमी अडथळा निर्माण होईल यासाठी पोलीस व महापालिका प्रशासनाने समन्वयाने काम करावे, अतिक्रमणावर तात्काळ कारवाई करावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सर्व विभागांनी जबाबदारीने आपली



कामे पार पाडावीत, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज भोसरी येथील प्रभाग क्र. ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित विभागांना विविध महत्त्वपूर्ण सूचना देत कामाचा सविस्तर आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणी दरम्यान त्यांचे समवेत नगरसदस्या भिमाबाई फुगे, प्रा. सोनाली गव्हाणे तसेच

(उर्वरित पान २ वर)

> **भोसरी परिसरातील प्रभाग क्र. ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. याबाबत स्थानिक नागरिक तसेच नगरसदस्यांकडून हा रस्ता तात्पुरता बंद ठेवावा आणि पर्यायी स्वरूपात एकेरी वाहतूक सुरू ठेवावी, अशी सातत्याने मागणी करण्यात येत होती. या मागणीची दखल घेऊन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत श्रीराम नवमीपर्यंत सदर रस्ता पूर्णतः बंद ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. श्रीराम नवमीनंतर कामाच्या प्रगतीनुसार हा रस्ता एकेरी वाहतुकीसाठी टप्प्याटप्प्याने खुला करण्यात येईल, जेणेकरून नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल आणि कामही सुरळीत पार पडेल. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग पुन्हा दुहेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. ही उपाययोजना तात्पुरती असली तरी ती नागरिकांच्या सोयी, सुरक्षितता आणि वाहतुकीच्या शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी पोलीस आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करून पर्यायी मार्गांचा वापर करावा.**
>
> **- रवि लांडगे, महपौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# पिंपरी-चिंचवडमध्ये पीएम आवास योजनेचा टप्पा दोन

## सहा ठिकाणी गृहप्रकल्प राबविणार; आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी 8,745 सदनिका उपलब्ध होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरात पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये रावेत, मामुर्डी, पुनावळे, वडमुखवाडी, ताथवडे आणि चोविसावाडी या सहा ठिकाणी गृहप्रकल्प राबविण्यात येणार आहे. किवळे आणि डुडुळगाव येथे प्रकल्पाचे काम सुरू आहे. हे आठ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील आठ हजार 745 कुटुंबांना हक्काचे घर मिळणार आहे



न्यायालयात वाद गेल्याने तसेच, मुदतीमध्ये जागा ताब्यात न आल्याने रावेत येथील 934 सदनिकांचा गृहप्रकल्प रद्द करण्यात आला. तेथील लाभार्थ्यांना किवळ येथील खासगी गृहप्रकल्पात सदनिका देण्यात आल्या. प्रकल्प रद्द करण्याची नामुष्की ओढवलेल्या रावेत येथील गृहप्रकल्पाच पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

तसेच, रावेत, मामुर्डी, पुनावळे, वडमुखवाडी, ताथवडे, आणि चोविसावाडी या सहा ठिकाणी महापालिकेच्या वतीने दुसर्‍या टप्प्यात ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यापैकी किवळे, रावेत, पुनावळे, वडमुखवाडी, मामुर्डी या पाच ठिकाणी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी गृहप्रकल्प असणार आहेत. तर, उर्वरित ताथवडे, चोविसावाडी आणि डुडूळगाव या तीन ठिकाणी एचडीएच गटासाठी (बेघरासाठी घरे) गृहप्रकल्प असणार आहे.

रावेत येथील 1 हजार 8 सदनिकांच्या गृहप्रकल्पास मंजुरी मिळण्यासाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मंजुरी मिळताच निविदा प्रक्रिया राबवून काम सुरू केले जाणार आहे, असे पंतप्रधान आवास योजना विभागाचे कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल यांनी सांगितले. महापालिकेने पहिल्या टप्प्यात पंतप्रधान आवास योजनेत बोर्‍हाडेवाडी, चर्‍होली, पिंपरीतील उद्यमनगर आणि आकुर्डीतील मोहननगर येथे गृहप्रकल्प उभारला आहे. आर्थिक दृष्‍ट्या दुर्बल घटकांतील कुटुंबांना 3 हजार 668 सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे. अंतिम टप्प्यात असलेल्या डुडुळगाव येथील गृहप्रकल्पातील 1 हजार 190 सदनिकांची सोडत काढण्यात आली आहे.

### सहा हजार 800 सदनिका बांधणार

» पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आतापर्यंत चार प्रकल्पातील 3 हजार 668 सदनिकांचे वितरण करण्यात आले आहे. अंतिम टप्प्यात असलेल्या डुडुळगाव येथील गृहप्रकल्पातील 1 हजार 190 सदनिकांची सोडत काढण्यात आली आहे. रावेत येथील 1 हजार 8 सदनिकांचा प्रकल्पाचा आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे. त्याचबरोबर मामुर्डीत 800, पुनावळेत 1 हजार 200, वडमुखवाडीत 1 हजार 200, ताथवडेत 2 हजार 400 आणि चोविसावाडीत 1 हजार 200 अशा 6 हजार 800 सदनिकांचा प्रकल्पांसाठी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे महापालिकेच्या पंतप्रधान आवास योजनेचे कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल यांनी सांगितले.

# लोणावळा शहरातील रस्ते व स्कायवॉक मार्गांना गती

## आमदार सुनील शेळके यांचा पीएमआरडीएकडे ठोस पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आमदार सुनील शेळके यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) नवनियुक्त आयुक्त अभिजीत चौधरी यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत लोणावळा शहरातील मुख्य रस्ता, स्कायवॉककडे जाणारा रस्ता तसेच देहूफाटा ते येलवाडी या मार्गांवरील रखडलेल्या कामांबाबत अधिकार्‍यांचे लक्ष वेधण्यात आले. ही कामे तातडीने पूर्ण करण्याची आग्रही मागणी आमदार शेळके यांनी केली.




याशिवाय मावळ तालुक्यातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांकडे जाणार्‍या रस्त्यांसाठी अद्याप कन्सल्टंट नेमणूक न झाल्याने कामे रखडली असल्याची बाबही आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. या संदर्भात त्वरित कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच ‘इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्पा’अंतर्गत असलेली कामे टेंडर प्रक्रियेत अडकून पडल्याने त्यालाही विलंब होत असल्याचे बैठकीत समोर आले.

यासर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत आयुक्त अभिजीत चौधरी यांनी कामांची गुणवत्ता राखत त्यांना गती देण्याचे आश्वासन दिले. मावळच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार सुनील शेळके यांचा प्रशासकीय पाठपुरावा सातत्याने सुरू असून, प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी ते अधिकार्‍यांशी सतत संपर्कात असल्याचे पुन्हा एकदा या बैठकीतून स्पष्ट झाले.

तालुक्यातील विकासकामांना चालना देण्यासाठी घेतलेली ही बैठक मावळच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात असून, आमदार शेळके यांच्या नेतृत्वाखाली विकासाची गती अधिक वाढणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत

आमदार सुनील शेळके यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) नवनियुक्त आयुक्त अभिजीत चौधरी यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत लोणावळा शहरातील मुख्य रस्ता, स्कायवॉककडे जाणारा रस्ता तसेच देहूफाटा ते येलवाडी या मार्गांवरील रखडलेल्या कामांबाबत अधिकार्‍यांचे लक्ष वेधण्यात आले. ही कामे तातडीने पूर्ण करण्याची आग्रही मागणी आमदार शेळके यांनी केली.

# राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क रस्त्याच्या कामाला गती!

(पान १ वरून)

नगरसदस्य सागर गवळी, जालिंदर शिंदे, विराज लांडे आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील तसेच पाणीपुरवठा, स्थापत्य, शहरी दळणवळण, ड्रेनेज, जलनिस्सारण, नगररचना आदी विभागांचे कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान महापौर यांनी पोलीस प्रशासनास रहदारी कमी करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच नागरिकांना योग्य मार्गदर्शन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या स्थापत्य विभागास रस्त्याचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देताना कामाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये, यावर त्यांनी विशेष भर दिला. शहरी दळणवळण विभागास वाहतूक व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. तसेच पाणीपुरवठा, ड्रेनेज व जलनिस्सारण विभागांना रस्त्याच्या कामासोबतच संबंधित पायाभूत सुविधा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. भविष्यात रस्ता पुन्हा उकरावा लागू नये यासाठी सर्व कामे समन्वयाने पूर्ण करावीत, असे त्यांनी स्पष्ट केले. नगररचना विभागास नियोजनबद्ध विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागास कामाच्या परिसरात स्वच्छता राखणे, कचरा व्यवस्थापन सुरळीत ठेवणे तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करून रस्ता मोकळा ठेवावा, जेणेकरून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

पाहणीदरम्यान महापौरांनी प्रभागातील नगरसदस्य व नगरसदस्या यांच्याशीही संवाद साधत स्थानिक समस्या व नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्या अनुषंगाने संबंधित अधिकार्‍यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

# विनानिविदा कचरा प्रक्रिया प्रस्ताव ठेका अखेर रद्द...

## आता निविदा काढूनच कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार : आयुक्त नवल किशोर राम

**पुणे | प्रतिनिधी**

उरूळी देवाची येथे ५०० मेट्रिक टन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी विनानिविदा देण्यात आलेला प्रस्ताव अखेर महापालिका प्रशासनाने मागे (रद्द) घेतला आहे. हा प्रकल्प आता नियमित निविदा प्रक्रियेद्वारेच राबविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

महापालिकेच्या स्थायी समितीसमोर अलीकडेच कामकाज नियमावलीतील कलम ५:२:२ नुसार हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यानुसार भूमी ग्रीन एनर्जी या कंपनीला ५०० टन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प देण्याचा प्रस्ताव होता. यामध्ये १०+१० अशा २० वर्षांसाठी प्रति टन ६९० रुपये टिपिंग फी आणि दरवर्षी १० टक्के वाढ अशी तरतूद करण्यात आलेली होती.



### वाहतुकीत होणार सुधारणा

» मेट्रो सुरू झाल्यानंतर शिवाजीनगर ते हिंजवडी हा प्रवास कमी वेळेत पूर्ण होणार आहे. यामुळे आयटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतूक कोंडीही कमी होईल. खासगी वाहनांचा वापर घटल्याने प्रदूषणातही घट होण्याची शक्यता आहे. आधुनिक आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होऊन शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल होणार आहे.

दरम्यान काँग्रेस नगरसेवक प्रशांत जगताप यांनी इतक्या दीर्घ कालावधीसाठी विनानिविदा प्रस्ताव आणण्यास तीव्र विरोध दर्शवत हा विषय कार्यपत्रिकेवर घेण्याची मागणी केली होती. यानंतर हा प्रस्ताव स्थगित झाला आणि प्रशासनावर टीकेची झोड उठली. तर काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे आणि गटनेते चंद्रकांत कदम यांनी या प्रस्तावावर आक्षेप घेत आयुक्तांवर राजकीय दबावाखाली काम केल्याचा आरोप केला. विशेषत: भाजप आमदार योगेश टिळेकर यांच्या नातेवाईकांच्या कंपनीला लाभ देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी पत्रकार परिषद घेऊन केला होता.

याबाबत आयुक्त नवल किशोर राम म्हणाले की, हडपसर परिसरातील उघड्यावर साचणाऱ्या कचऱ्याचा प्रश्न गंभीर असून त्यावर न्यायालयीन सुनावणी सुरू आहे. त्यामुळे ओल्या कचऱ्यावर तातडीने प्रक्रिया करणे आवश्यक होते. नवीन प्रकल्प उभारण्यास ८ ते १० महिने लागणार आहे. सध्या कार्यरत असलेल्या कंपनीलाच काम देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. दरम्यान, अरविंद शिंदे यांनी या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच स्थायी समितीकडे सादर केलेला प्रस्ताव सार्वजनिक करावा, अशीही त्यांनी मागणी केली आहे.

### अंतिम टप्प्यातील कामे

» शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून सुमारे ९४ टक्के काम पूर्ण झाले आहे. सध्या सिग्नलिंग प्रणालीची तांत्रिक चाचणी सुरू आहे. तसेच आरडीएसओ आणि सीएमआरएस यांची तपासणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पहिल्या टप्प्यात १२ स्थानके सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मे अखेरपर्यंत प्रवासी सेवेला सुरुवात करण्यासाठी कामाचा वेग वाढवण्यात आला आहे.

> "प्रकल्पाचा कालावधी अधिक असल्याचे लक्षात आल्यानंतर हा प्रस्ताव मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रस्ताव स्थायी समितीकडे जाण्यापूर्वीच तो मागे घेण्याचा निर्णय झाला होता. मात्र, त्यापूर्वी स्वाक्षरी झाल्याने तो समितीकडे गेला. तसेच या प्रकरणात कोणताही राजकीय दबाव नाही. लवकरच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी निविदा काढण्यात येईल."
>
> \- नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका

# स्वारगेट–कात्रज मेट्रोचा विस्तार शिवापूर टोलनाक्यापर्यंत

## खेड-शिवापूर टोलनाका परिसरातून प्रस्तावित रिंगरोड पर्यंत करण्याच्या प्रस्तावाला महापालिकेच्या शहर सुधारणा समितीने मान्यता दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गिकेचे विस्तारीकरण खेड-शिवापूर टोलनाका परिसरातून प्रस्तावित रिंगरोड पर्यंत करण्याच्या प्रस्तावाला महापालिकेच्या शहर सुधारणा समितीने शुक्रवारी मान्यता दिली. त्यानुसार हा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मुख्य सभेपुढे पाठविण्यात आला आहे.



### मेट्रो विस्ताराला हिरवा कंदील

» स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गिकेचा विस्तार खेड-शिवापूर टोलनाका व प्रस्तावित रिंगरोडपर्यंत करण्याच्या प्रस्तावाला शहर सुधारणा समितीने मंजुरी दिली आहे. वाढत्या नागरीकरणामुळे दक्षिण पुण्यातील वाहतूक ताण कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. या विस्तारामुळे नागरिकांना जलद, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा मिळणार असून खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा आहे.

शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट या मेट्रो मार्गिकेचा विस्तार कात्रज पर्यंत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. गेल्या आठवड्यात मेट्रो भवन प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रोचे दोनशे किलोमीटर लांबीचे जाळे येत्या काही दिवसांत उभारण्यात येणार असून त्याद्दष्टीने नियोजन सुरू झाल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर महापालिकेच्या शहर सुधारणा समितीच्या बैठकीत स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गिकेचे विस्तारीकरण खेडशिवापूर आणि परिसरातील रिंगरोड पर्यंत करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. त्याला शहर सुधारणा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

'दक्षिण पुणे, कात्रज परिसर तसेच शिवापूर टोलनाका आणि प्रस्तावित रिंगरोडलगत झपाट्याने वाढणारे नागरिकरण आणि त्यातून वाढता वाहतूक ताण लक्षात घेता मेट्रो विस्तार अत्यंत आवश्यक आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना जलद, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे, असे शहर सुधारणा समितीच्या अध्यक्षा स्मिता वस्ते यांनी सांगितले.

प्रस्तावित रिंगरोडशी मेट्रोचे प्रभावी कनेक्टिव्हिटी निर्माण झाल्यास शहरातील वाहतूक वितरण अधिक संतुलित होईल आणि भविष्यातील शहरी नियोजनाला मोठी चालना मिळेल, असा दावाही वस्ते यांनी केला.

या विस्तारामुळे कात्रजच्या पुढील भाग, शिवापूर टोलनाका परिसर तसेच रिंगरोडलगतच्या विकसित होत असलेल्या भागांना मोठा फायदा होणार असून खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.

शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून शहर सुधारणा समितीने सदर प्रस्तावास मंजुरी देऊन अंतिम मान्यतेसाठी तो मुख्य सभेकडे शिफारस केला आहे,अशी माहिती समितीकडून देण्यात आली.

# पुणेकरांची तहान भागणार! मुळशी धरणातून 7 टीएमसी पाणी मिळणार

## अपुऱ्या पडणाऱ्या पाणीपुरवठ्यावर मात करण्यासाठी राज्य सरकार आणि टाटा हायड्रो पावर कंपनीचा महत्त्वपूर्ण पुढाकार.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाढते नागरीकीकरण आणि पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. खडकवासला धरण साखळीवरील ताण कमी करण्यासाठी मुळशी धरण ७ टीएमसी पाणी घेण्याच्या प्रस्तावाला राज्य सरकार आणि टाटा कंपनीने तत्त्वतः मान्यता दिली आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. मागील आठवड्यात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि आमदार राहुल कुल यांच्यासह टाटा कंपनीच्या प्रतिनिधींसोबत या विषयावर सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत विखे पाटील यांनी प्रस्तावाला हिरवा कंदील दाखवत, पाण्याचे नियोजन करण्यासाठी तातडीने अभ्यास गट स्थापन करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मुळशी धरणावरून टाटा हायड्रो पावर कंपनीमार्फत भीरा जलविद्युत प्रकल्पासाठी पाणी वापरले जाते. प्रकल्पाचा एकूण जिवंत पाणीसाठा १८.४७ टीएमसी, तर मृत साठा ८.१२ टीएमसी इतका आहे. पुणे शहराला सध्या प्रामुख्याने खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा होतो. मात्र, वाढत्या नागरीकरणामुळे हे पाणी अपुरे पडत आहे

पुणे शहरातील वाढते नागरीकीकरण आणि पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. मुळशी धरणातून पश्चिमेकडे वीजनिर्मितीसाठी सोडले जाणारे आणि पर्यायाने समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी पुणे शहरासाठी वळवता येईल, असा पर्याय पुढे आला होता. टाटा कंपनी व राज्य सरकारने दिलेल्या मान्यतेनंतर मुळशी धरणातून पुणे शहराला सात टीएमसी पाणी देण्याबाबत जवळपास शिक्कामोर्तब झाले आहे. त्यानंतर मिळणाऱ्या तांत्रिक मान्यतेनुसार हा प्रकल्प पुढे जाईल, असेही सूत्रांकडून सांगण्यात आले.



### मुळशी धरणातून पाणीपुरवठ्याचा नवा मार्ग

» पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे आणि पिण्याच्या पाण्याच्या वाढत्या गरजेमुळे पर्यायी स्रोत शोधण्याची गरज निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर मुळशी धरणातून ७ टीएमसी पाणी वळवण्याच्या प्रस्तावाला राज्य सरकार आणि टाटा कंपनीने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. सध्या पुण्याला खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो; मात्र वाढत्या नागरीकरणामुळे हा साठा अपुरा पडत आहे. मुळशी धरणातून वीजनिर्मितीनंतर समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी शहरासाठी वापरण्याचा पर्याय पुढे आला आहे. या निर्णयामुळे भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार आहे. लवकरच अभ्यास गट स्थापन करून तांत्रिक बाबींचा आढावा घेत प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती दिली जाणार आहे.

### असे असणार नियोजन

» जलसंपदा विभाग आणि टाटा कंपनीच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा एक विशेष गट तयार करण्यात आला आहे.
» हे पाणी नेमके कधी, कोठे आणि कोणत्या तांत्रिक पद्धतीने (उदा. बोगदा किंवा वाहिनीद्वारे) वळवायचे, याचा तांत्रिक अभ्यास सध्या सुरू आहे.
» पुढील आठवड्यात होणाऱ्या बैठकीत हा अभ्यास गट अहवाल सादर करेल. त्यानंतर या प्रस्तावाला अधिकृत तांत्रिक मान्यता दिली जाणार आहे.

### प्रकल्पाचे महत्त्व

» ७ टीएमसी अतिरिक्त पाण्यामुळे शहराचा पाणीपुरवठा अधिक सक्षम होईल.
» हे पाणी प्रामुख्याने वीजनिर्मितीनंतर वाया जाणाऱ्या साठ्यातून वापरले जाणार आहे
» तांत्रिक मान्यतेनंतर या प्रकल्पाच्या पायाभूत सुविधांसाठी निधीची तरतूद केली जाईल.

# राजगुरुनगरमध्ये युरिया टंचाई; शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा

## गॅस टंचाईचा परिणाम; खत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना तासन्तास उन्हात उभे राहावे लागत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले असून, गॅस सिलिंडरबरोबरच युरिया खताच्या टंचाईने शेतकरी त्रस्त झाले आहेत. खेड तालुका खरेदी विक्री संघाच्या केंद्रात युरिया खरेदीसाठी शनिवारी (दि २१)शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. गॅस सिलिंडर आणि शेतीसाठी गरजेचे खत मिळवण्यासाठी सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतकरी आणि कामगार वर्ग उन्हात उभे राहून या टंचाईचा सामना करत आहे.

इस्रायल-इराण युद्धामुळे नैसर्गिक वायू (गॅस) पुरवठ्यात मोठी अडचण निर्माण झाली आहे. भारताच्या युरिया उत्पादनासाठी लागणारा मोठा भाग नैसर्गिक वायूवर अवलंबून आहे. आखातातील देशांकडून (ओमान, कतार, सौदी अरेबिया इ.) युरिया आयात होत असते, ज्यात सुमारे ७५ टक्के वाटा आहे. युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक विस्कळीत झाल्याने गॅस आणि खतांच्या किंमतीत वाढ झाली आहे. केंद्र सरकारने खत कंपन्यांसाठी गॅस कोटा ७० टक्क्यांवर मर्यादित केल्याने उत्पादनावर परिणाम होत आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

खेड तालुक्यातील सहकारी खरेदी विक्री संघात शुक्रवारी रात्री उशिरा एक ट्रक (३५ टन) युरिया उपलब्ध झाला. माहिती मिळताच शनिवारी भल्या सकाळी शेतकऱ्यांची गर्दी उसळली. उन्हाच्या तीव्र झळा असतानाही शेतकरी रांगेत उभे राहून तिष्ठत राहिले. मर्यादित आवक आणि भरमसाठ मागणी यामुळे रांगेत उभे राहून देखील अनेक शेतकऱ्यांना संध्याकाळी रिकाम्या हाताने परतावे लागण्याच्या शक्यतेने गर्दी झाली. स्थानिक शेतकऱ्यांच्या मते, उन्हाळी हंगामातील भुईमूग, कांदा, भाजीपाला पिकांसाठी युरिया अत्यावश्यक आहे, पण टंचाईमुळे खत देण्यात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी (खासगी विक्रेते) काळ्या बाजारात जादा दराने युरिया विक्री होत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. राज्य सरकारने खत साठा पुरेसा असल्याचे सांगितले असले तरी प्रत्यक्षात टंचाई जाणवत आहे. या संकटातून शेतकऱ्यांना लवकर मुक्ती मिळावी आणि पुरवठा साखळी मजबूत व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



> “आधार कार्डनुसार एका शेतकरी व्यक्तीला एक युरिया खत ३५० रुपये प्रति गोन (४५किलो) विक्री केली जात आहे. तुटवडा असला तरी कोणतीही भाववाढ आकारली जात नाही. संघाकडे साठा असुन मागणी असल्याने अधिक युरिया उपलब्ध करून दिला जाणार आहे.
> - नरेंद्र थिगळे, अध्यक्ष, खेड तालुका खरेदी विक्री संघ